गोदातीर समाचार दि. 16/07/2022

# नवीन मोंढा भागातील सोयाबीन आणि हळद चोरणाऱ्या दोघांना अटक; शिवाजीनगर पोलिसांची कारवाई





**नांदेड–** नवीन मोंढा मार्केट यार्डमधील काही दुकानांचे पत्रे काढून हळद व सोयाबीन चोरणाऱ्या दोन चोरट्यांना शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली आहे. या दोघांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या नवीन मोंढा येथील मार्केट यार्डमध्ये बालाजी दत्तराव कोसडे (वय ४०) रा. मगनपुरा यांचे संकल्प ट्रेडिंग नावाचे दुकान आहे. या दुकानातून १४ जुलैच्या रात्री टीनशेडमधील ६० किलो वजनाचे सहा प्लास्टिकचे सोयाबीनचे पोते जवळपास किंमत २१ हजार रुपये दिनेश गंगाधर मैराळे (वय २६) राहणार वाई तालुका मुदखेड हल्ली मुक्काम दत्तनगर नांदेड आणि धरमचंद हरी पवार (वय ३८) राहणार खंडोबा बाजार परभणी हल्ली मुक्काम दत्तनगर नांदेड या दोघांनी चोरून नेले. ही माहिती मिळताच दुकान मालक बालाजी कोसडे यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक डॉ. नितीन काशीकर आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे यांनी दिनेश मैराळे आणि धरमचंद पवार या दोघांना अटक केली. त्यांनी यापूर्वीही सोयाबीन व हळदीचे पोते चोरल्याची कबुली दिली. त्यांच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.